**<u>सं.फौ.ख.क्र.३६९५/२०२३</u>**
**सचिन वि. मनीषा.**
**निशाणी क्रं. ३६ खाली**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. अमोल देसाई यांच्यामार्फत.</u>**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी एकाच वसाहतीमध्ये राहतो. आरोपी क्र. ०१ व माझी पत्नी चांगल्या मैत्रीणी आहेत. माझी पत्नी आरोपीस मदत करते. माझ्या पत्नीने आरोपीस क्र. ०१ यांना रू. १ लाखाची मदत केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रक्कमेच्या परतफेडीकरीता आरोपी क्र.०१ ने मला धनादेश दिलेले आहे व सदर धनादेश आरोपी क्र. ०१ याचा स्वत:चा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीविरूध्द रू. तीन लाख त्यांना दिल्याबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. मी आरोपीस एकत्रीत रू. तीन लाख दिलेले नाहीत. मी आरोपीस दोन वेळेस रोख स्वरूपात पैसे दिलेले आहे. माझ्या पत्नीने पैसे दिलेले आहे. मी माझ्या पत्नीचे खाते उतारे दाखल केलेले नाहीत. मी इंजीनीयर आहे. मी एकमेव कुटुंबातील कमावता सदस्य आहे. मी आयकर विवरण भरतो. माझ्यात व आरोपीत लेखी करारनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कोरा धनादेश आरोपीने दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ०२ याने माझ्यासमक्ष धनादेशावर सही केली नाही.

**०२.** माझे बावधान येथे एचडीएफसी बॅंकेत खाते आहे. मी धनादेश देहुरोड येथे जमा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस धनादेश न वटता परत आल्यानंतर नोटीस पाठवीली नाही. मी डाक पावती दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस नोटीस मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.०२ यांनी माझ्याकडुन कोणतीही आर्थिक मदत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला धनादेशाचा गैरवापर करून मी आरोपींविरूध्द खोटे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ०२ हे मला कायदेशीर देणे लागत नाही. मी आयकर भरणा विवरण दाखल

करून शकतो. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

दि. ०७/०३/२०२६ **श्रवणोत्तर स्विकृत,**

**साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले.**

**(अभय म. विभुते)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

**(अभय म. विभुते)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.